# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे - ४११०१८

## वैद्यकीय मुख्य कार्यालय — धन्वंतरी कक्ष

## सभावृत्तांत

---

दिनांक — ०६/०७/२०२३ वेळ — दु. ०३.०० वा.

विषय — धन्वंतरी स्वास्थ्य योजना / विमा योजना अनुषंगाने बैठकीचा सभावृत्तांत..

धन्वंतरी स्वास्थ्य योजना धोरण - २०१३ नुसार विषयांकीतकामी चर्चा करणेकामी गुरुवार, दि.०६ जुलै, २०२३ रोजी दु.०३.०० वा. मा.अतिरिक्त आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित केली होती. सदरचे बैठकीस खालील अधिकारी /कर्मचारी उपस्थित होते.

| अ.क. | अधिकारी नांव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री.जितेंद्र वाघ | अतिरिक्त आयुक्त |
| २ | श्री.बबन झिंजुर्डे | अध्यक्ष, पिं.चिं.म.न.पा.कर्मचारी महासंघ |
| ३ | श्री.प्रमोद भोसले | मुख्य लेखापरिक्षक |
| ४ | श्री.जितेंद्र कोळंबे | मुख्य लेखा व वित्त अधिकारी |
| ५ | डॉ.लक्ष्मण गोफणे | आरोग्य वैद्यकीय अधिकारी |
| ६ | डॉ.अभयचंद्र दादेवार | अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी |
| ७ | श्री.नितीन समगीर | प्रतिनिधी, पिं.चिं.म.न.पा.कर्मचारी महासंघ |
| ८ | श्री.मनोज माछरे | प्रतिनिधी, पिं.चिं.म.न.पा.कर्मचारी महासंघ |

सदर बैठकीमध्ये खालीलप्रमाणे चर्चा करणेत येऊन निर्णय घेणत आला —

१. विमा कंपनी सोबत झालेल्या करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार विमा कंपनी आहे त्याच अटी व शर्तीवर, आहे त्याच प्रिमिअमवर काम करणेस तयार आहेत किंवा कसे याबाबत विचारणा करावी. पिं.चिं.मनपा कर्मचारी महासंघ यांनी करारनाम्यामधील अट क्र.८.१० मध्ये Buffer Limit हे र.रु.५ कोटी असून त्यामध्ये प्रती कुटूंब प्रती वर्ष र.रु.२० लाख विमा मर्यादा आहे (र.रु.३ लाख विमा कंपनी विमा पॉलीसी मधून देणार आवश्यकता भासल्यास र.रु.१७ लाखांपर्यंत मा.आयुक्त यांचे मान्यतेने देणेत बाबत तरतुद आहे.) तरी सदर चर्चेअंती एखाद्या कुटूंबास आवश्यकता भासल्यास र.रु.२० लाखाचे वरील बिल अदायगी र.रु.५ कोटीचे Buffer Limit करता येईल किंवा कसे ? याबाबत संबंधित विमा कंपनीस विचारणा करावी, अशी मागणी केली.

२. एखाद्या कुटूंबास आवश्यकता भासल्यास र.रु.२० लाखाचे वरील बिल अदायगी र.रु.५ कोटीचे Buffer Limit मधून अदायगी करण्याची मागणी विमा कंपनीने अमान्य केल्यास सदर २० लाखावरील बिलाची रक्कम धन्वतंरी स्वास्थ समितीची मान्यता घेऊन मा.आयुक्त यांचे मान्यतेने मनपा फंडातून रुग्णालयास अदा करावी.

३. र.रु.५ कोटी Buffer Limit संपलेस आवश्यकता भासल्यास मनपा फंडातून खर्च करणेकामी मा.आयुक्त यांची मान्यता घेणेत यावी.

४. शासनमान्य ५ गंभीर आजारांवरील औषधोपचार (Out patient Benefit) कामी विमा कंपनी सोबत झालेल्या करारनाम्यामधील अट क्र.८.३२ मध्ये र.रु.५,०००/- प्रति कुटूंब प्रति वर्ष इतकी खर्च मर्यादा असून र.रु.५,०००/- पेक्षा जास्त रकमेची आवश्यकता भासलेस र.रु.१ कोटी चे Buffer Limit मर्यादेमधून मा.आयुक्त यांचे मान्यतेने देता येईल असे नमुद केले आहे. र.रु.१ कोटी Buffer Limit संपलेस आवश्यकता भासल्यास मनपा फंडातून खर्च करणेकामी मा.आयुक्त यांची मान्यता घेणेत यावी.

५. वरील प्रमाणे विमा कंपनीस लेखी विचारणा करणेत येऊन त्यांचेकडील प्राप्त उत्तराचे अनुषंगाने मा.आयुक्त यांचेकडे बैठक आयोजित करणेत येऊन त्यावर अंतिम निर्णय घेणेत येईल, व तद्नंतर मा.औद्यागिक न्यायालय येथे प्रलंबित असलेला दावा माघार घेणे बाबत अध्यक्ष, पिं.चिं.मनपा कर्मचारी महासंघ यांना विचारणा करावी.

यानंतर सर्व उपस्थितांचे आभार मानून बैठकीचे कामकाज संपल्याचे जाहीर करण्यात आले.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी
वैद्यकीय विभाग

अध्यक्ष
पिंपरी चिंचवड कर्मचारी कर्मचारी महासंघ

मुख्य लेखा व वित्त अधिकारी
लेखा विभाग

मुख्य लेखापरिक्षक
मुख्य लेखापरिक्षण विभाग

अतिरिक्त आयुक्त -२
पिंपरी चिंचवड महानगरपालिका